**शपथेवर सुरू**

**पुढील सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एस्.ए. फर्नांडीस यांच्यातर्फे**

१३. पोलिस ठाणे येथे तक्रार दिल्यानंतर दिनांक ०९/०८/२०१३ रोजी मी पुन्हा पोलिस ठाणे येथे गेले होते. मी माझ्यासोबत एकूण पाच मोबाईल पोलिस ठाणे येथे नेले होते. ज्या मोबाईल्समध्ये शिवीगाळ व अश्लिल मॅसेजेस पाठविले होते ते मी नेले होते. सदरच्या मोबाईलपैकी एक माझा स्वतःचा, एक आईचा, एक वडीलांचा, एक भावाचा व एक वहिनीचा मोबाईल फोन होता. माझ्या वडीलांचे नांव चंद्रकांत नारायण प्रभू आहे. त्यांचा नोकीया कंपनीचा मोबाईल होता. त्याच्या सिमकार्डचे शेवटचे पाच अंक मी सांगू शकते ५१५८१. वडीलांच्या मोबाईलवरती एक मॅसेज असा होता की ''क्या आप अपने बेटीका गांड और चुथ दोनो ले सकते हो. आय हॅव रिलीव्हड हर.'' अन्य मॅसेजेसमध्ये मादरचोद, बहिनचोद अशा आई बहिणींवरच्या शिव्या, धमक्या होत्या. असे अंदाजे ३४ ते ४० मॅसेजेस होते.

१४. माझ्या भावाचे नांव सौमित्र चंद्रकांत प्रभू आहे. त्याचा मोबाईल मायक्रोमॅक्स कंपनीचा आहे. त्याच्या सिमकार्डचे सुरूवातीचे अंक ७८ व शेवटचे अंक २९६ असे होते. त्याच्या फोनवर '' तेरी बेहन, बीबी और मॉ को तीनोंको ले रहॉ हूँ, हिंमत है तो अकेले मे आके लड नहि तो तु रंडी का बेटा हो.'' असेच खुप मॅसेजेस होते. सुमारे २५ ते ३० मॅसेजेस होते.

१५. माझ्या आईचे नांव उज्वला चंद्रकांत प्रभू आहे. तिचा मोबाईल मोटोरोलाचा होता. तिच्या सिमकार्डचा नंबर ९०१११५५९८१ असा होता. तो मोबाईल त्यावेळी मी वापरत होते हे त्याला माहिती होते. त्यावेळी बरेच मॅसेजेस माझ्यासाठी होते. त्यामधील एका मॅसेजमध्ये असे लिहिले होते की'' वहॉ आके खुनही करना पडेगा तुम लोगोंका, क्राईम पेट्रोल मे ऐसेही एक बापने सबकी गांड टोकरेमे डाली थी.'' सदरच्या मोबाईलमध्ये ७० च्या जवळ जवळ मॅसेज होते.

१६. माझ्या वहिनीचे नांव रमा सौमित्र प्रभू असे आहे. तिचा नोकीया एक्सप्रेस म्युझिक हा मोबाईल होता. त्यामध्ये त्यावेळी माझा सिमकार्ड टाकला होता. त्याचे शेवटचे चार अंक ८४४७ असे होते. त्या फोनमध्ये काहीतरी फॉल्ट होवून मॅसेजेस डिलीट झाले होते. दोनच मॅसेज राहिले होते. पाचवा मोबाईल माझा होता. तो मायक्रोमॅक्स कंपनीचा होता. त्यातील सिमकार्डचे शेवटचे अंक १५९७ असे होते. त्यावरती अशाच प्रकारचे शिव्या, धमकी, अश्लिल मॅसेजेस होते. त्यामध्ये ७ मॅसेजेस होते. मी पोलिस ठाणे येथे मोबाईल घेवून गेले त्यावेळी तिथे पोलिसांशिवाय दोन पंच होते. पोलिस ठाणे येथे सोनी कंपनीचा हॅडी कॅम होता. पोलिसांनी मला एकएका मोबाईलचा इनबॉक्स ओपन करायला सांगितला. मॅसेज बॉक्समध्ये तारीख, वेळ व ज्या नंबरवरून मॅसेज आला तो मोबाईल नंबर दर्शविणा—या तसेच संपूर्ण मॅसेजचा त्यांनी एक फोटो काढला. पोलिसांनी सर्व मॅसेजेसचे फोटो काढले. माझ्या वडीलांच्या व भावाच्या मोबाईलवर काही मॅसेजेस वे टू एसएमएस (way to sms) या साईटवरून गेले होते. पोलिसांनी पंचाच्या सहया पंचनाम्यावर माझ्या समोर घेतल्या. पंचनामा माझयासमोर झाला. दिनांक ०९/०८/२०१३ रोजी झालेला जप्ती पंचनामा तोच आहे. पोलिसांनी घेतलेले फोटो कम्प्युटरच्या स्क्रीनवर दाखवले होते. प्रथम खबरी अहवालाची प्रत **नि. १०९** कडे आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. आर.डी.बिले यांच्यातर्फे**

नि. ११० कडील आदेशानुसार उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्विकृत.

सही/—
(एस्.ए. कानशिडे)
दिनांक :—१६/०७/२०१९. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, कुडाळ